## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 (अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्ती आदेश

वाचले : 1 ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम (आय) व कलम 77 (अ) मधील तरतूद

2 ) पालशेत वि.का.स.सेवा संस्था मर्या. पालशेत ता.गुहागर जि.रत्नागिरी या संस्थेविरुध्द प्राप्त तक्रार अर्ज दि.29/09/2017, दि.23/10/2017, दि.26/11/2017 व दि.01/12/2017

3 ) वाचले क्र. 3 च्या तक्रारीस अनुसरुन् संस्थेकडून प्राप्त उत्तरे दि.29/10/2017 व 08/11/2017

4 ) संस्थेच्या दि.25/09/2017 रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

5 ) या कार्यालयाकडिल दि.15/12/2017 ची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 ( सुधारित 2013 ) चे क.75 (5) या कार्यालयाकडिल जा.क्र.सहश्रे1/प्र1/पालशेतविकास/नोटिस/175/2017 दि.15/12/2017 ची नोटिस व त्या अनुषंगाने दि.03/01/2018 ची सुनावणी

6 ) संदर्भ क्र. 5 चे अनुषंगाने दि.03/01/2018 ची नोटिस व त्या अनुषंगाने दि.16/01/2018 रोजीची सुनावणी

7 ) या कार्यालयाकडिल जा.क्र.सहश्रे1/प्र1/अपात्रताआदेश/पालशेतविकास/2018 दि.22/01/2018 चा आदेश

ज्याअर्थी, पालशेत वि.का.स.सेवा संस्था मर्यादित, पालशेत ता.गुहागर जि.रत्नागिरी ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 ( सुधारित 2013 ) या कायदयान्वये सहकारी अधिकारी श्रेणी 1, सहकारी संस्था, ता.गुहागर जि.रत्नागिरी या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रांतर्गत कार्यरत असून तीचा नोंदणी क्र.3118 दि.30/09/1920 असा आहे आणि,

ज्याअर्थी, संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 ( सुधारित 2013 ), नियम 1961, संस्थेचे उपविधी यांना अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे आणि,

ज्याअर्थी, सन 2016-17 ची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.25/09/2017 रोजी झालेली असून त्याचे इतिवृत्ताचे अवलोकन केले असता कायदयानुसार सर्व विषयांचे कामकाज न होता बेकायदेशीरपणे वार्षिक सभा संपविण्यात आली आहे आणि,

ज्याअर्थी, वाचले क्र. 2 अन्वये संस्थेविरुध्द तक्रार अर्ज प्राप्त झालेले असून त्यांस संस्थेने वाचले क्र. 3 अन्वये उत्तरे केलेली आहेत आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 (सुधारित 2013) चे क.75/2/2अ, 3 व 4 या कलमांचे उल्लंघन केल्याने क. 75 प्रमाणे संचालक मंडळावर पाच वर्षे अपात्रता व सचिव यांना रु.5000/- एवढा आर्थिक दंड का लावण्यात येवू नये ? याबाबत नोटिस देण्यात आली होती व त्या अनुषंगाने दि.03/01/2018 रोजी या कार्यालयामध्ये सुनावणी ठेवण्यात आली होती व त्या दिवशी 10 समिती सदस्य व सचिव उपस्थित होते. 5 समिती सदस्य आणि सचिवाने लेखी म्हणणे सादर केलेले होते.

ज्याअर्थी, वाचले क्र. 6 अन्वये नोटिस देवून दि.16/01/2018 रोजी पुढील सुनावणी ठेवण्यात आली होती व त्यावेळी (1) श्री.सुभाष सहदेव चव्हाण व (2) श्रीमती सरस्वती शांताराम अवेरे हे दोन समिती सदस्य गैरहजर होते व इतर 10 जण उपस्थित होते. सदर सुनावणीसाठी 6 तक्रारदार समिती सदस्य यांचे वतीने एकत्रित लेखी म्हणणे मांडण्यात आले.

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, उपरोक्त नमूद केलेनुसार वाचले क्र. 7 ने पालशेत विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्यादित, पालशेत ता.गुहागर जि.रत्नागिरी या संस्थेच्या 11 समिती सदस्यांना 5 वर्षांसाठी पालशेत विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्यादित,पालशेत ता.गुहागर या संस्थेच्या समिती सदस्य पदासाठी निवडले जाण्यास किंवा राहण्यास [illegible] असलेबाबतचा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 ( सुधारित 2013) चे कायदा कानून व संस्थेचे पोटनियमनुसार चालविणे सभासदांच्या व संस्थेच्या हिताचे असल्याने उपरोक्त नमूद केलेल्या कारणास्तव महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 ( सुधारित 2013) मधील 77 अ (ब,ब-1) मधील तरतुदीनुसार संस्थेच्या समितीचा कालावधी समाप्त झालेला असल्याने आणि प्रशासकिय पोकळी निर्माण झालेली असल्याने नवीन समितीची निवड होईपर्यंत महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम 1960 (सुधारित 2013) मधील तरतुदीचा आणि प्राप्त अधिकार शक्तिचा वापर करुन संस्थेची व्यवस्था / कामकाज चालू ठेवणेसाठी मी पुढीलप्रमाणे प्राधिकृत अधिकारी नियुक्तिचा आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 ( सुधारित 2013) चे कलम 77 अ (ब, ब 1) नुसार उपरोक्त नमूद कारणास्तव पालशेत विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्यादित, पालशेत ता.गुहागर जि.रत्नागिरी या संस्थेच्या संदर्भ् क्र.7 मधे नमूद केलेनुसार संचालक यांना प्रतिबंध करुन मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 (सुधारित 2013) चे क.77 अ(ब, ब 1) अन्वये मला प्राप्त झालेल्या वैधानिक अधिकाराचा वापर करुन मी विनय पां.शिंदे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.चिपळूण जि.रत्नागिरी उपरोक्त संस्थेचे दैनंदिन कामकाज चालू ठेवून महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक प्रक्रिया पूर्ण करुन नवनिर्वाचित संचालक समितीकडे ताबा सुपूर्त करण्यासाठी या आदेशाच्या तारखेपासून जास्तीत जास्त 6 महिने कालावधीकरिता श्री.प्रशांत मोहिते, उपव्यवस्थापक (कृषी), रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, रत्नागिरी शाखा पाटपन्हाळे ता.गुहागर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करित आहे. नियुक्ति केलेले प्राधिकृत अधिकारी यांनी सदर संस्थेच्या दप्तराचा ताबा घ्यावयाचा आहे व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

हा आदेश आज दि.22/01/2018 रोजी माझ्या सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

ठिकाण : गुहागर

(व्हि.पी.शिंदे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,ता.चिपळूण
जि.रत्नागिरी

Scanned by CamScanner

प्रती,

| | | |
|---|---|---|
| 1 | श्री.नितिन राजाराम कनगुटकर | चेअरमन, पालशेत विकास संस्था, पालशेत |
| 2 | श्री.संतोष सिताराम पालकर | व्हा.चेअरमन पालशेत विकास संस्था,पालशेत |
| 3 | श्री.सुभाष सहदेव चव्हाण | सदस्य, पालशेत विकास संस्था,पालशेत |
| 4 | श्री.सुधिर विश्वनाथ कनगुटकर | सदस्य, पालशेत विकास संस्था,पालशेत |
| 5 | श्री.नरेंद्र श्रीरंग नार्वेकर | सदस्य, पालशेत विकास संस्था,पालशेत |
| 6 | श्री.प्रशांत नामदेव सुर्वे | सदस्य, पालशेत विकास संस्था,पालशेत |
| 7 | श्री.दिपक जगन्नाथ पालशेतकर | सदस्य, पालशेत विकास संस्था,पालशेत |
| 8 | श्री.राजाराम गणपत अवेरे | सदस्य, पालशेत विकास संस्था,पालशेत |
| 9 | सो.सुहासिनी विनायक नागे | सदस्य, पालशेत विकास संस्था,पालशेत |
| 10 | सौ.संगिता संदिप घवाळे | सदस्य, पालशेत विकास संस्था,पालशेत |
| 11 | सौ.सरस्वती शांताराम अवेरे | सदस्य, पालशेत विकास संस्था,पालशेत |

12 ) श्री.प्रशांत मोहिते, प्राधिकृत अधिकारी, पालशेत वि.का.स.सेवा संस्था मर्या. पालशेत ता.गुहागर तथा उपव्यवस्थापक (कृषी), र.जि.म.स.बँक म.रत्नागिरी शाखा पाटपन्हाळे ता.गुहागर

2/- यांनी तात्काळ उक्त संस्थेच्या दप्तर, जायदादीचा ताबा घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

13 ) श्री.संदिप सिताराम चव्हाण, सचिव, पालशेत वि.का.स.सेवा संस्था मर्यादित, पालशेत ता.गुहागर जि.रत्नागिरी

2/- यांनी संस्थेच्या दप्तराचा व जायदादीचा ताबा तात्काळ प्राधिकृत अधिकारी यांचेकडे दयावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

1 ) मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी

2 ) मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, रत्नागिरी

**प्रत माहितीसाठी :**

1 ) उपलेखापरिक्षक, सहकारी संस्था, ता.गुहागर

2 ) बँक व्यवस्थापक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. रत्नागिरी शाखा पाटपन्हाळे

**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था,ता.चिपळूण**
**जि.रत्नागिरी**

२५७ ते २६९

जा.क्र.सअश्रे1/प्र1/प्राधिकृतअधिकारी/पालशेतविकास/2018
सहकारी अधिकारी श्रेणी 1, सहकारी संस्था, ता.गुहागर
यांचे कार्यालय
दि.22/01/2018

Scanned by CamScanner